**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट्र**

Estd. 1962
NAAC 'A' Grade
MHRD NIRF-28th Rank

PHONE: EPABX – 0091-0231-2609000 CoE Office: 0231-2609068
B.A. Exam. Section: 0231-2609116 Website: www.unishivaji.ac.in
E-mail: ba.section@unishivaji.ac.in

---

संदर्भ क्र: शिवाजी वि/बी.ए./परीक्षा/२२१८ दिनांक : ०८-०९-२०१७

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक
संलग्नीत महाविद्यालये/परिसंस्था

विषय :- ऑक्टो/नोव्हें २०१७ मध्ये होणा-या परीक्षांचे अर्ज जमा करावयाच्या व परीक्षा प्रारंभच्या तारखांबाबत.
संदर्भ :- शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/२०३३, दि. १ ऑगस्ट, २०१७.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१७ मध्ये होणा-या बी.ए., बी.कॉम, बी.बी.ए. बी.सी.ए. परीक्षांच्या परीक्षा अर्ज भरावयाच्या तारखा (नियमित, विलंब व अतिविलंब) तसेच परीक्षा प्रारंभ तारखा कळविण्यात आल्या आहेत, तथापी मागील काही परीक्षेस असे निदर्शनास आले आहे की परीक्षा अर्ज भरतांना विद्यार्थी उशिरा येतो, परीक्षा अर्जामध्ये चुकीचे विषय लिहीतो तसेच अर्ज चूकीच्या प्रणालीमध्ये भरले जातात याचा परिणाम निकाल प्रक्रियेवर होतो म्हणून परीक्षा अर्ज भरतांना खालील सूचनांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे, याबाबतच्या सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

१ परीक्षा अर्ज भरण्यास एक महिन्याचा कालावधी दिला असतांना देखिल विद्यार्थी नियमित, विलंब व अतिविलंब या सर्व तारखा निघून गेल्या नंतर निरनिराळी कारणे सांगून उशिरा परीक्षा अर्ज भरण्यास येतो, परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा संपल्यानंतर परीक्षेची पुढील तयारी करण्यात येते उदा. नेमलिस्ट, समरी व ओळखपत्रे तयार करणे, तथापी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करता परीक्षा शुल्क, विलंब, अतिविलंब व प्रतीदिनी असे शुल्क आकारुन परीक्षा अर्ज स्विकारला जातो पण अशा विद्यार्थ्यांना उशिरा बैठक क्रमांक दिल्यामुळे त्याचे बैठक क्रमांक समरीमध्ये येत नाहीत काही वेळा त्यांची प्रश्नपत्रिका संबंधीत महाविद्यालयावर पोहोच होत नाही, अशा वेळी परीक्षेवेळी प्रश्नपत्रिका मेल द्वारे मागविली जाते, हा सर्व गोंधळ टाळण्यासाठी विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज विहीत वेळेतच भरण्याबाबत सूचना दयाव्यात, विहीत मुदतीनंतर येणारे परीक्षा अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

२ परीक्षा अर्ज भरतांना सत्र १, ३ व ५ परीक्षा अर्जामध्ये विद्यार्थी चूकीचे विषय लिहीतात व नंतर ते परस्पर महाविद्यालयामध्ये बदलून घेतात व बदललेल्या विषयाची परीक्षा देतात पण सदर बदल विद्यापीठाला परीक्षेपूर्वी कळवित नाहीत त्यामुळे त्यांचा पहिल्या विषयांचा Ab निकाल जाहिर होतो

त्यानंतर विद्यार्थी विषय बदलाबातचे पत्र घेवून विद्यापीठाकडे येतात. परीक्षा अर्ज मध्ये विषय चूकीचे लिहू नयेत, अपवादात्मक परिस्थितीत कोणी विषय बदलला तर तो बदल परीक्षेपूर्वीच विद्यापीठाला कळवूण त्याबाबतची दुरुस्ती करुन घेणे किंवा परीक्षा अर्ज online approve करण्यापूर्वी विषयाची दुरुस्ती करुन घेणे अत्यावश्यक आहे. परीक्षेनंतर किंवा निकाला नंतर कोणत्याही परिस्थितीत विषय बदलाबाबतचे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी

३ अ) प्रथम वर्षानंतर गॅप घेवून व्दितीय वर्षास किंवा व्दितीय वर्षानंतर तिस-या वर्षास प्रवेश घेणारे. ब) वार्षिक पध्दतीमधून सत्र पध्दतीमध्ये प्रवेश घेणा-या
क) Double Graduation साठी परीक्षा अर्ज भरणा-या, ड) बाहेरील विद्यापीठातून प्रथम किंवा द्वितीय वर्षाची परीक्षा देवून पुढील परीक्षा शिवाजी विद्यापीठात देणा-या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज (RBA 11(i), RBA12(a), RBA12(b), RBA 17) ऑनलाईन पध्दतीने भरता येणार नाहीत. त्यामुळे **कमांक ३ मधील सर्व परीक्षा अर्ज मॅन्युअली पध्दतीने भरावयाचे आहेत याची नोंद घ्यावी**, तसेच मॅन्युअली फॉर्म भरताना विषय कोड लिहीणे आवश्यक आहे. सदर अर्जा सोबत पूर्वीच्या परीक्षेच्या गुणतक्त्याच्या झेरॉक्स सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे. सदर विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज स्वतंत्रपणे जमा करावेत.

४ संगणक प्रणालीमध्ये (ऑनलाईन) अप्रु होणा-या परीक्षा अर्जाच्या अप्रु यादया सत्रनिहाय स्वतंत्र जमा कराव्यात तसेच क्र. ३ मधील अ ते ड मधील परीक्षा अर्ज व्यवस्थित भरले आहेत का ते तपासून ते वर्णानुक्रमे लावून त्याच्यावर यादी जोडून स्वतंत्र जमा करावेत. दंडक ८० अ नुसार जे विद्यार्थी भाग १,२ किंवा ३ ला सहा वर्षाच्या कालावधीमध्ये उतीर्ण झालेले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरून घेतांना दक्षता घ्यावी.

५ यापूर्वी डीयुडीसी प्रकल्पातून एमकेसिएल द्वारे सुरु असलेले सर्व परीक्षांचे कामकाज विद्यापीठाच्या online.shivajiuniversity.ac.in या प्रणालीतून सर्व परीक्षार्थीकरीता महाविद्यालयातूनच पूर्वीप्रमाणेच करण्यात यावेत

तरी उपरोक्त बाबत विद्यार्थ्यांना सक्त सूचना दयाव्यात तसेच परीक्षेचे काम पहाणा-या कर्मचा-यांनी याची दक्षता घ्यावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/-
उपकुलसचिव